## <u>नियमित दिवाणी दावा क्रं.२६६/२०१६ मधील अर्ज (नि.२० व २८) वरील एकत्रित आदेश</u>

प्रतिवादी क्रं.७, ८ यांचेतर्फे दाखल अर्ज (नि.२०), वादीतर्फे दाखल अर्ज (नि.२८) व प्रतिवादीतर्फे दाखल म्हणणे (नि.३५) वाचले. प्रतिवादी व वादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकले. दाखल कागदपत्रे तपासली.

२) प्रतिवादी क्रं.७, ८ यांनी अर्ज (नि.२०) मध्ये सर्व्हे क्रं.२८५/८ हा पूर्णपणे त्यांचे मालकीचा व कब्जातील असून वादीने प्रतिवादींचे भावकीतील लोकांकडून दावा मिळकत खरेदी केल्याचे सांगितले. प्रतिवादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावणेसाठी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादींचा सर्व्हे क्रं.२८५/८ क्षेत्र ३ आर या मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सर्व्हे क्रं. २८५/२ व २८५/८ या दोन्ही स्वतंत्र मिळकती असून त्यांची मोजणी होणेसाठी व हद्दीखुणा निश्चित करुन मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रवितादींनी अर्ज मंजुर करणेची मागणी केली आहे. वादींनी म्हणणे दाखल केले नाही परंतू मोजणीसाठी स्वतंत्र अर्ज (नि.२८) दाखल केला आहे.

३) वादीचे अर्ज (नि.२८) मध्ये कथन की, सर्व्हे क्रं.२८५/२ व २८५/८ या हिस्स्याची पोट-फाळणी होवुन सदर जमिनीतील ऊसाचे पिक तोडून नेवु नये, वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये, याकरीता दावा दाखल केला आहे. दिनांक ०१/०१/२०१५ रोजी प्रतिवादी क्रं.७ ने सर्व्हे क्रं.२८५/२ मधील दक्षिण बाजुकडील उसाची पाचट पेटवली व दिनांक ०३/०२/०१५ रोजी कॅनॉल लिफ्टचे पाणी बांध फोडून त्या क्षेत्रास दिले. वादीचा यामुळे दक्षिण बाजुने ऊस होरपळला. मौजे विडणी गावी गट एकत्रिकरण योजना लागू झाली नसल्यामुळे दावा मिळकतीला भूमापन किंवा गट क्रमांक नाहीत. सर्व्हे क्रं.२८५/८ मधील पश्चिम बाजुचा ९ आणे हिस्सा वादीने खरेदी केला आहे. सर्व्हे क्रं.२८५/२ व २८५/८ मध्ये ऊसाचे पिक वादीने केल्याची बाब प्रतिवादीने मान्य केली आहे. प्रतिवादी क्रं.७ व ८ हे दावा मिळकतीत कब्जेवहिवाट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सर्व्हे क्रं.२८५ हा ८ हिस्से असलेला मोठा सर्वे नंबर असून त्याची फाळणी होण्याकरीता लगतचे सर्वे नंबरची मोजणी होणे आवश्यक आहे. सबब, दावा मिळकतीच्या प्रत्यक्ष

वस्तुस्थितीची पाहणी करुन नकाशा दाखल करण्यासाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, फलटण यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्याची व अर्ज मंजुर करण्याची वादीने विंनती केली आहे.

४) प्रतिवादी क्रं.७ व ८ यांनी म्हणणे (नि.३५) दाखल करुन वादीचे अर्ज (नि.२८) ला हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे कथनानुसार, वादी हा दावा मिळकतीचा कायदेशीर मालक नसतांना, प्रतिवादी क्रं.७ व ८ यांचे गरीब आर्थिक परिस्थितीचा फायदा घेवुन मानसिक, शारीरीक त्रास देत आहे. दावा मिळकत महार वतन म्हणून प्रतिवादींना मिळाली असून वंशपरंपरेने ते वहिवाट करत आहेत. प्रतिवादी क्रं.७ हिचे मयत पती-राजेंद्र जगताप यांना फसवुन कमल बगाडे व वादीने सर्व्हे क्रं.२८५/२ मधील ०-३० आर क्षेत्र खरेदी केले परंतु त्यांची ताबा-वहिवाट नाही. सर्व्हे क्रं.२८५/८, ०-०३ आर क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्रं.७ व ८ यांची मालकी असून सदर मिळकतीतील पिकास मशागत व खुरपणी करणेस वादी अडथळा करत आहेत. वादी तसेच प्रतिवादी क्रं.७ व ८ हे सह-हिस्सेदार असलेने वादीची मागणी बेकायेदशीर आहे. सर्व्हे क्रं.२८५/८ चे क्षेत्र कमी असलेने फाळणी करता येणार नाही. सबब, प्रतिवादी क्रं.७ व ८ यांनी अर्ज (नि. २८) रद्द करण्याची मागणी केली आहे.

५) प्रतिवादी क्रं.७, ८, वादी यांची कथने, दाव्याचे व बचावाचे स्वरुप विचारात घेता, वादातीत मिळकतीची प्रत्यक्ष वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादींनी याबाबत वाद उपस्थित केला असल्यामुळे दाव्याचा गुणदोषांवर निर्णय होण्याकरीता प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज (नि.२० व २८) मंजूर केले आहेत.

२. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, फलटण यांनी अर्ज (नि.२० व २८) मध्ये नमूद केलेल्या सर्व्हे क्रं.२८५/२ व २८५/८ या मिळकतीची पाहणी करुन दावा मिळकतीची सदय परिस्थितीचा नकाशादर्शक

वस्तुस्थितीजन्य अहवाल एक महिन्याच्या मुदतीत सादर करावा.

३. प्रतिवादी क्रं.७, ८ तसेच वादीने आवश्यक शुल्क संबंधित कार्यालयात जमा करावे व चलनाची साक्षंकित प्रत १५ दिवसात न्यायालयात सादर करावी.

४. येणेप्रमाणे कमिशनपत्र काढावे.

५. आदेशाची प्रत अर्ज (नि.२८) सोबत ठेवावी.

फलटण (सौ. ज. सं. जगदाळे)
दिनांक-१४/११/२०१६. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण.